## प्रेसनोट दि. १७.१२.२०२४

**लोकसेवीका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, वय-४२ वर्षे, मपोह/१९०८, विश्रामबाग पोलीस ठाणे, रा.शारदानगर, पोतदार हायस्कुल शेजारी, सांगली यांनी ५०,०००/- रुपये लाच मागणी केलेबाबत सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले तक्रारी अर्जावरून फसवुणकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी तसेच अर्ज चौकशीमध्ये मदत करण्यासाठी यातील लोकसेविका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, महिला पोलीस हवलदार विश्रामबाग पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. १७.१२.२०२४ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. १७.१२.२०२४ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी व सापळा कारवाई केली असता, त्यामध्ये यातील आरोपी लोकसेविका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले तक्रारी अर्जावरून तक्रारदार यांच्याविरूध्द विश्रामबाग पोलीस ठाणेत फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व अर्ज चौकशीमध्ये मदत करण्यासाठी स्वतः करीता पंचांसमक्ष तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी करून भारती विद्यापीठ, डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय, सांगली सांगलीवाडी येथे पंचांसमक्ष तक्रारदार यांचेकडून ५०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवीका श्रीमती मनिषा नितीन कोंगनोळीकर उर्फ भडेकर, वय-४२ वर्षे, मपोह/१९०८, नेमणुक- विश्रामबाग पोलीस ठाणे सांगली यांचेविरुध्द सांगली शहर पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री. उमेश पाटील, पोलीस निरीक्षक श्री.विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक श्री. किशोरकुमार खाडे, पोलीस अंमलदार सिमा माने, विना जाधव, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, अजित पाटील, ऋषीकेश बडणीकर, पोपट पाटील, चंद्रकांत जाधव, सुदर्शन पाटील, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, अतुल मोरे यांनी केली आहे.

**नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर व मोबाईल नंबर ९५५२५३९८८९ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.**

**१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net**
**२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB**
**३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in**

**(उमेश दा. पाटील)**
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner